**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२७१**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १८ ऑगस्ट, २०२२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी झालेल्या २७१व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. जयंत कुमार बांठिया
समर्थ अंगण, रूम नं. १६०७,
बिल्डींग-३A,पु.ल.देशपांडे रोड,
मिल्लत नगर,
अंधेरी –पश्चिम,
मुंबई – ४०० ०५३ - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

महानगर आयुक्त
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण - सदस्य

प्रशासक
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७१व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२९ जुलै, २०२२ (शुक्रवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ०४.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२.<br>(प्रत्यक्ष व दूरचित्रसंवादाद्वारे)** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्री. एस.व्हि.आर.श्रीनिवास<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. मनोज सौनिक
अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (२)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रमोद आहुजा
संचालक (कामे/प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. बसवराज एम. भद्रगोड
संचालक (प्रकल्प-२ब),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अंकुश नवले
वित्तीय सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रदिप यादव
प्रमुख,
नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रकाश भागंरे
मुख्य अभियंता (अ.का.),
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सु.भू.पेदे
सचिव, कार्यकारी समिती

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

डॉ. सोनिया सेठी, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग आणि (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग (अ.का.) यांचे "**पदसिध्द निमंत्रित**" म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच श्री. महेश पाठक, तत्कालीन प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग आणि (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग (अ.का.) यांनी **'पदसिध्द निमंत्रित'** म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी झालेल्या २७०व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी झालेल्या २७०व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र. ३ : मेट्रो मार्ग ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या मेट्रो मार्गिकेतील ठाणे-भिवंडी-वडपा (वि.रा.म. ८४) रस्त्यावरील कशेळी पथकर नाका ते अंजूरफाटा दरम्यान रस्त्याची पायाभूत सुधारणा, स्ट्रॉम वॉटर ड्रेन, रोड फर्निचर व इतर संबंधित कामासाठी (पॅकेज सी.ए.-१३८) मागविण्यात आलेल्या ई-निविदेसाठी मंजुरी देणेबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या १४१ व्या बैठकीत मेट्रो मार्ग- ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या प्रकल्पास मान्यता देण्यात आली असून मंत्रिमंडळाच्या दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या १५० व्या बैठकीत सदर प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग ५ (ठाणे- भिवंडी -कल्याण)

..२/-

या उन्नत मेट्रो मार्गाच्या उभारणीकरिता रु. ८,४१७ कोटी किंमतीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे. सदर मेट्रो प्रकल्पासाठी शासनाने दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिनांक २६ जून, २०१९ रोजी सदर प्रकल्पास “महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प (Vital Urban Transport Project)” म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, मेट्रो मार्ग -५ या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात करण्यात येत असून टप्पा -१ (ठाणे ते भिवंडी) मध्ये स्थापत्य कामे हाती घेण्यात आली आहेत. सदर प्रकल्पाच्या टप्पा- १ ची लांबी १२.७ कि. मी. असून एकूण ६ मेट्रो स्थानके आहेत. सदर लांबीतील स्थापत्य कामांकरिता Consortium of Systra-CEG-SMCIPL या सहभागी संस्थेची सामान्य सल्लागार (General Consultant) व कंत्राटदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर कंत्राटदारामार्फत सद्य:स्थिती मध्ये प्रकल्पाच्या बांधकामाकरिता स्थापत्य कामे प्रगतीपथावर आहेत. स्थापत्य कामांची दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंतची एकूण भौतिक प्रगती ६०.७५% आहे.

३.३ याबाबत पुढे अशी चर्चा झाली की, सदर प्रकल्पाच्या टप्पा-१ (ठाणे ते भिवंडी) मधील मेट्रो मार्गिका अनुक्रमे ठाणे महानगरपालिका, जिल्हा परिषद ठाणे व भिवंडी निजामपुर शहर महानगर पालिका हद्दीतून जात आहे. सदर मार्गिकेतील जिल्हा परिषद ठाणे मधील लांबी ६.५ कि.मी. असुन कशेळी खाडी ते अंजुरफाटा दरम्यान आहे. सदर ६.५ कि. मी. लांबीमध्ये १.५ कि.मी. लांबीतील मेट्रो मार्गिका ठाणे-भिवंडी-वडपा (वि.रा.म. ८४) रस्त्याच्या बाहेरील जागेतून जात आहे व ५.० कि.मी. लांबीतील मार्गिका रस्त्याच्या मध्यगे मधून जात आहे. सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्या अखत्यारितील आहे. ह्या रस्त्यावरील पावसाच्या पाण्याच्या निचरा करण्याकरीता बांधण्यात आलेले स्ट्रॅम वॉटर ड्रेन नादुरूस्त असुन स्ट्रॅम वॉटर ड्रेन मध्ये गाळ व मातीचा थर साचल्यामुळे पावसाच्या पाण्याच्या निचरा होत नाही. तसेच सदर रस्त्यावर मेट्रो प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. या सर्व कारणांमुळे सदर लांबीतील रस्ता मोठया प्रमाणात खराब झालेला असून या भागामध्ये मोठ्या संख्येने गोदाम असल्यामुळे अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे सदर लांबीमधील डांबरी पृष्ठभाग खराब होऊन त्याठिकाणी अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे.

तसेच सदर लांबीमध्ये मेट्रो प्रकल्पाचे बांधकाम सुध्दा सुरू आहे. त्यामुळे सदर लांबीतील रस्त्याची सुधारणा करणे आवश्यक असल्यामुळे रस्ता दुरूस्तीच्या कामाकरीता सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन ई-निविदा मागविण्यात आल्या.

३.४ याबाबत पुढे अशीही चर्चा झाली की, सदर कामांकरीता दि. २९ मार्च, २०२२ रोजी रू. ७२.२१ कोटी रक्कमेची मागविण्यात आलेल्या ई-निविदांच्या अनुषंगाने एकूण दहा निविदा प्राप्त झाल्या व या निविदांचे लिफाफा 'अ' (निविदा व इसारा रक्कम) व लिफाफा 'ब' (तांत्रीक प्रस्ताव) दि. २ मे, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. या कामाकरीता खालील दहा निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १) | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. |
| २) | मे. अश्विनी इन्फ्राडेव्हल्पमेंट प्रा. लि. |
| ३) | मे. माँ. मुंब्रादेवी इन्टरप्राईजेस |
| ४) | मे. साकेत इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. |
| ५) | मे. देव इंजिनिअर्स |
| ६) | मे. जीजाऊ कन्स्ट्रक्शन |
| ७) | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्रा. लि. |
| ८) | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. |
| ९) | मे. कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि. |
| १०) | मे. न्यु-इंडिया रोडवेज |

३.५ याबाबत अशी चर्चा झाली की, ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक प्रस्तावाची छाननी मेट्रो मार्ग -५ (पॅकेज क्र. सी.ए. १३८) या प्रकल्पाच्या सामान्य सल्लागार (General consultant) M/s Systra-CEG-SMCIPL यांच्या मार्फत करण्यात आली व त्यासंदर्भातील तांत्रिक मुल्यमापन अहवाल दि. २० मे, २०२२ रोजी सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या पात्र/ अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १) | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. | पात्र |
| २) | मे. अश्विनी इन्फ्राडेव्हल्पमेंट प्रा. लि. | अपात्र |
| ३) | मे. माँ. मुंब्रादेवी इन्टरप्राईजेस | अपात्र |
| ४) | मे. साकेत इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. | पात्र |
| ५) | मे. देव इंजिनिअर्स | पात्र |
| ६) | मे. जीजाऊ कन्स्ट्रक्शन | पात्र |
| ७) | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्रा. लि. | पात्र |
| ८) | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. | पात्र |
| ९) | मे. कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि. | पात्र |
| १०) | मे. न्यु-इंडिया रोडवेज | अपात्र |
| | **एकूण** | **पात्र- ७, अपात्र- ३** |

३.६ याबाबत अशी चर्चा झाली की, पॅकेज क्र. १३८ अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र सात निविदिाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा ‘क’ आर्थिक प्रस्ताव) दि. ९ जून, २०२२ रोजी ई-निविदाकारांच्या उपस्थित प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व ई-निविदा लिफाफा ‘क’ आर्थिक प्रस्तावांची छाननी मेट्रो मार्ग-५ प्रकल्पाच्या “सामान्य सल्लागार” यांच्यामार्फत करण्यात आली व त्यासंदर्भातील आर्थिक मुल्यमापन अहवाल दि. १७ जून, २०२२ रोजी सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार पात्र सात निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे :-

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नांव** | **निविदेची रक्कम (रू. कोटी)** | **प्राप्त देकार (रू. कोटी)** | **% कमी/ अधिक (-)/(+)** |
|---|---|---|---|---|
| १) | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. | ७२.२१ | ७१.८५ | (-)०.४९% |
| २) | मे. साकेत इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. | | ५९.२६ | (-)१७.९३% |
| ३) | **मे. देव इंजिनिअर्स** | | **५६.५४** | **(-)२१.७०%** |
| ४) | मे. जीजाऊ कन्स्ट्रक्शन | | ६५.१० | (-) ९.८५% |
| ५) | मे. बिटकॉण इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर र डेवल्पमेंट प्रा. लि. | | ५८.७४ | (-)१८.६६% |
| ६) | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | ६७.७२ | (-)६.२१% |
| ७) | मे. कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि. | | ६२.९५ | (-)१२.८२% |

३.७ याबाबत पुढे अशी चर्चा करण्यात आली की, पॅकेज क्र. सी. ए. १३८ मध्ये **मे. देव इंजिनिअर्स** यांचा **रू. ५६.५४ कोटी** रक्कमेचा लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा म्हणजेच रू. ७२.२१ कोटीच्या तुलनेत २१.७०% कमी दराचा आहे. सदर निविदाकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे व रास्त असून सामान्य सल्लागार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार लघुत्तम निविदाकारांचा देकार पुढील प्रमाणे आहे :-

| **पॅकेज क्र.** | **लघुत्तम निविदाकाराचे नाव** | **अनूसुचित** | **निविदेची रक्कम (रू. कोटी)** | **प्राप्त लघुत्तम देकार ( रू. कोटी)** | **निविदेच्या रक्कमेच्या तुलनेत कमी /अधिक % (-)/(+)** |
|---|---|---|---|---|---|
| सी. ए. १३८ | मे. देव इंजिनिअर्स | ‘अ’ | निरंक | निरंक | निरंक |
| | | ‘ब’ | ७१.२१ | ५५.५४ | (-) २२.०० % |
| | | ‘क’ (स्थिर) | १.०० | १ .०० | समतुल्य |
| | | **एकूण** | **७२.२१** | **५६.५४** | **(-)२१.७० %** |

३.८ महानगर आयुकत यांनी असेही नमूद केले की, रस्ता सुधारणीच्या कामाकरीता (पॅकेज सी. ए. १३८) प्राप्त झालेल्या तांत्रिक व आर्थिक लिफाफाची छाननी/ पृथ:करण मेट्रो मार्ग-५ प्रकल्पाच्या सामान्य सल्लागार (General Cnsultant) M/s Systra-CEG-SMCIPL यांच्यामार्फत करण्यात आले व सदर सल्लागारामार्फत प्राप्त झालेल्या तांत्रिक व आर्थिक अहवालाच्या अनुषंगाने निविदा स्विकृती संदर्भात शिफारस करण्याकरीता प्राधिकरणांतर्गत महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने संचालक (कामे) यांच्या अध्यक्षतेखाली निविदा समिती गठित करण्यात आली. त्याअनुषंगाने प्राप्त निविदांच्या तांत्रिक लिफाफाच्या संबंधी सामान्य सल्लागारामार्फत प्राप्त तांत्रिक मुल्यमापन अहवाल निविदा समितीच्या दि. ६ जून, २०२२ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला व सदर अहवालासंबंधी संयुक्त चर्चा करण्यात आली. तसेच सदरचा अहवाल संयुक्तीक असल्याचे ठरविण्यात आले व सदर निविदांच्या आर्थिक लिफाफा ‘क’ उघडण्याकरीता शिफारस करण्यात आली. तद्:नंतर दि. ९ जून, २०२२ रोजी सदर निविदेचा आर्थिक लिफाफा ‘क’ उघडण्यात आला. सदर निविदांच्या आर्थिक लिफाफा मध्ये लघुत्तम देकार मे. देव इंजिनिअर्स यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.७०% कमी दराने सादर केल्याने सदर दराबाबत खुलासा मिळण्याकरीता सामान्य सल्लागारामार्फत विचारण्यात आले. त्याअनुषंगाने मे. देव इंजिनिअर्स यांनी त्यांच्या दि. १५ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये सदरचा खुलासा सादर केला. सदर प्राप्त खुलासाच्या अनुषंगाने सामान्य सल्लागारामार्फत आर्थिक लिफाफ्याच्या छाननीचा मुल्यमापन अहवाल दि. १७ जून, २०२२ रोजी सादर केला. सदर अहवाल दि. २० जून, २०२२ रोजी आयोजित निविदा समितीच्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीत अहवालासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली व मे. देव इंजिनिअर्स यांच्या मार्फत सादर करण्यात आलेला खुलासा व सामान्य सल्लागाराचा आर्थिक मुल्यामापन अहवाल संयुक्तीक असल्याचे ठरविण्यात आले.

या संदर्भात अशी चर्चा झाली की, अंदाजित किंमतीच्या तुलनेत प्राप्त लघुतम देकार कमी आहेत. त्याअनुषंगाने सदरबाबत स्पष्टीकरण देण्यात आले की, शासन निर्णय दि. २७/०९/२०१८ अन्वये निविदाकाराने अंदाजपत्रकीय दाराच्या १०% पेक्षा कमी दराने भरल्यास अशा प्रकरणात निविदाकाराकडून सदरचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्याची सुनिश्चितता करण्याकरीता अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम प्राप्त केली जाईल.

महानगर आयुक्त यांनी असेही निदर्शनास आणले की, इतर तिन्ही निविदाकारांनी सादर केलेला देकार (-) ०.४९%, (-) ६.२१% व (-) ९.८५% एव्हढा आहे, जो की, अंदाजपत्रकीय दराच्या (-) १०% पेक्षा कमी आहे.

तसेच संचालक (कामे) यांनी असेही नमूद केले की, लघुतम निविदाकाराकडे त्याचा देकार कशाप्रकारे कार्यशील आहे याबाबत विचारणा केली होती. त्याअनुषंगाने सदर निविदाकाराने पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे:-

अ) स्वतःची यंत्रसामग्री आणि R.M.C. प्लांट आहे, ज्यामुळे त्याचा ओव्हरहेड खर्च कमी होईल.

ब) सदर कामासाठी आवश्यक असलेल्या विविध साहित्य पुरवठादाराशी त्याचा वार्षिक करार आहे, त्यामुळे त्यांना सर्वोत्तम स्पर्धात्मक दर मिळत आहेत.

क) कायमस्वरूपी कुशल आणि अकुशल कामगार आहेत.

ड) विविध कामगार व यंत्रसामग्री पुरवठादारांशी वार्षिक करार केला आहे. त्यामुळे त्यांना सर्वोत्तम स्पर्धात्मक दर मिळत आहेत.

ई) तसेच त्यांच्यामार्फत सदर क्षेत्रामध्ये अशा प्रकारची कामे सुद्धा सुरु आहेत. त्याकरिता यंत्रसामुग्री व आणि मनुष्यबळ अगोदरच एकत्रित केले आहे, त्यामुळे त्यांचा अतिरिक्त ओव्हरहेड खर्च देखील कमी होईल.

फ) सर्वात महत्त्वाचे म्हणजे निविदा प्रक्रियेतील स्पर्धेमुळे त्यांनी सर्वात स्पर्धात्मक दर आणि अगदी किमान नफा यासह कमी देकार सादर केला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे सदर क्षेत्रामध्ये अशा प्रकारची कामे करण्याचा मोठा अनुभव आहे.

वरील बाबी निविदा समितीच्या शिफारसीमध्ये नोंद केल्या आहेत.

याबाबत पुढे अशी देखील चर्चा झाली की, उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करून निविदा समितीने मे. देव इंजिनिअर्स यांचा सर्व करांसहीत रू. ५६.५४ कोटी (रू. ५५.५४ कोटी अनु. 'ब' + १.०० कोटी अनु. 'क') रक्कमेचा लघुत्तम देकार वाजवी असल्याचे व स्विकृत करण्यास योग्य असल्याची शिफारस केली, असेही निदर्शनास आणून देण्यात आले.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४२५ :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून

कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सी.ए. १३८ साठी **मे. देव इंजिनिअर्स यांच्या रु. ५६.५४ कोटी** (सर्व करांसहीत) देकार स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समितीच्या बैठकीच्या कार्यवृताची प्रतिक्षा न पाहता मे. देव इंजिनिअर्स यांच्या लघुत्तम देकार **रु. ५६.५४ कोटीच्या** अनुषंगाने स्विकृती पत्र देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

“**आणखी ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र. ४ : ठाणे परिक्षेत्रातील घोडबंदर रस्त्यावर मेट्रो मार्ग ४ व ४अ या मार्गिकेत येत असणाऱ्या कासारवडवली व भाईंदरपाडा जंक्शनवर प्रस्तावित असणाऱ्या उड्डाणपुलाचे बांधकाम मेट्रो मार्ग ४अ च्या सी.ए -५४ अंतर्गत अतिरिक्त काम मे. जे. कुमार इंफ्राप्रोजेक्ट प्रा. लि. या कंत्राटदाराकडून करून घेण्याकरिता मंजुरी मिळण्याबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सादरीकरण केले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी झालेल्या १४४ व्या बैठकीत मेट्रो मार्ग – ४ अ (कासारवडवली – गायमुख) या प्रकल्पास मान्यता देण्यात आली असून मंत्रिमंडळाच्या दिनांक २७ डिसेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीमध्ये सदर प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक २५ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग ४-अ ( कासारवडवली – गायमुख) या उन्नत मेट्रो मार्गाच्या उभारणीकरिता रु.९४९ कोटी किंमतीच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कंत्राटदार नियुक्तीची निविदा प्रक्रिया पूर्ण करून लघुत्तम देकार सादर करणाऱ्या कंत्राटदारास (मे. जे.कुमार इंफ्राप्रोजेक्टस प्रा.ली.) दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी कार्यारंभ पत्र दिले. सदर कंत्राटदारामार्फत स्थापत्य कामास सुरुवात करण्यात आली असून स्थापत्य कामांची दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंतची एकुण भौतिक प्रगती ४१.२५ % आहे.

४.२ महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, घोडबंदर रस्त्यावरील आनंदनगर, कासारवडवली व भाईंदरपाडा या ३ जंक्शनवर वाहतूक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने उड्डाणपूल बांधणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच या संदर्भात जनतेची व स्थानिक लोक प्रतिनिधींची सदर तिन्ही उड्डाणपुलांबाबत आग्रही मागणी आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी २३ मार्च २०१६ रोजी घोडबंदर रोडवरील आनंद नगर, कासारवडवली आणि भाईंदरपाडा जंक्शनवर प्रस्तावित उड्डाणपूलांचे बांधकामासाठी रु. ७५ कोटी च्या रक्कमेला मान्यता दिली आहे.

४.३ याबाबत अशी चर्चा झाली की, प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून मेट्रो प्रकल्प आणि उड्डाणपूल हे दोन प्रकल्प एकत्रित बांधण्याकरीता मान्यता देण्यात आली व सदर उड्डाणपूलांचे तपशीलवार अंदाज सादर करून प्रकल्प अभियांत्रिकी विभागामार्फत बांधण्यात येण्याविषयी सुचना दिल्या. अभियांत्रिकी विभागामार्फत सदरील ३ उड्डाणपूलांचे सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याकरिता मे. एमियन्ड कन्स्लटिंग प्रा. लि. या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. मे. एमियन्ड कन्स्लटिंग प्रा. लि. द्वारे सादर करण्यात आलेला सदर सविस्तर प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी अभियांत्रिकी विभागाने अग्रेषित केला. तथापि, अतिरिक्त महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांनी सुचना दिल्या की, घोडबंदर मार्गावर मेट्रो प्रकल्पाचे काम मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेमार्फत करण्यात येत असल्यामुळे सदरील ३ उड्डाणपूलांची कामेही मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेमार्फत करण्यात यावीत. मे. एमियन्ड कन्स्लटिंग प्रा. लि. आणि मेट्रो मार्ग-४ प्रकल्पाच्या साधारण सल्लागारांसमवेत विविध बैठका आयोजित करण्यात आल्या. मे. एमियन्ड कन्स्लटिंग प्रा. ली. या सल्लागाराने सुचविलेल्या पर्यायांचा विचार करण्यात आला व वाहतूक नियोजन व अन्य बाबींचा विचार करून ३ R.E. भिंतींचा पर्याय तांत्रिक दृष्ट्या सुसाध्य असल्याचा अहवाल सादर केला आहे. प्रस्तावित ३ उड्डाणपूलांपैकी, भाईंदरपाडा उड्डाणपूल मेट्रो मार्ग-४अ च्या मार्गिकेत असून कासारवडवली उड्डाणपूलाचा काही भाग मेट्रो मार्ग-४अ व काही भाग मेट्रो मार्ग-४ मध्ये येतो. प्रस्तावित आनंदनगर हा उड्डाणपूल मेट्रो मार्ग-४ च्या मे. रिलायन्स इन्फ्रा - अस्टाल्डी जॉईंट व्हेंचर मार्फत बांधकाम चालू असलेल्या पॅकेज CA-१२ मध्ये येत आहे. तथापि, मे. रिलायन्स इन्फ्रा - अस्टाल्डी जॉईंट व्हेंचर ची प्रगती नियोजित वेळापत्रकाशी तुलना केली असता मंद असल्याकारणाने आनंदनगर उड्डाणपूलांच्या बांधकामाविषयी भविष्यात निर्णय घेता येईल.

मेट्रो प्रकल्प व उड्डाणपूल या दोन्ही प्रकल्पांच्या अमंलबजावणी करीता योग्य तो समन्वय साधण्याच्या दृष्टीकोनातून त्याचप्रमाणे अत्यंत वर्दळीचा असलेल्या घोडबंदर मार्गावर

..९/-

कमीत कमी वाहतूक कोंडी होण्याच्या दृष्टीकोनातून मेट्रो मार्ग-४अ प्रकल्पाच्या कामांतर्गत सदर उड्डाणपूलांची कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

४.४ याबाबत अशी सुद्धा चर्चा झाली की, प्रस्तावित दोन्ही ऊड्डाणपूलांची कामे ही मेट्रो मार्ग-४अ अंतर्गत अतिरिक्त कामे म्हणून प्रस्तावित करण्यात येत आहेत. मेट्रो मार्ग-४अ च्या Schedule C मध्ये असलेल्या तरतुदीनुसार MCGM SOR (२०१८) च्या दरसूची प्रमाणे सल्लागारामार्फत अंदाजित खर्च तयार करण्यात आला आहे. ३ R.E. भिंतीं सह पुलांचे बांधकाम या पर्यायावर मे. एमियन्ड कन्स्लटिंग प्रा. लि. या सल्लागाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २०१८ च्या दरसुचीवर आधारीत अंदाजित खर्च सादर केला. अंदाजित खर्च खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | उड्डाणपूलाचे नाव | प्रस्तावित मार्गिका | उड्डाणपूलाची लांबी | अंदाजीत खर्च (MCGM SOR २०१८) (रक्कम रू.) |
|---|---|---|---|---|
| १. | कासारवडवली | ३ + ३ | ४६० मि. | ३०,२८,९९,१२१ |
| २. | भाईंदरपाडा | ३ + ३ | ५२८ मि. | ३२,२३,०३,१९२ |
| **प्रकल्पांची एकुण किंमत (रुपये)** | | | | **६२,५२,०२,३१३/-** |

४.५ याबाबत अशी चर्चा झाली की, मेट्रो मार्ग-४अ च्या प्रकल्पाची स्थापत्य कामाची किंमत रु. ३४२,१३,४८,२७०/- आहे. या प्रकल्पात, आजपर्यंत मंजूर केलेले फरक (variation) जसे की :- स्थानकातील फरक (स्पाइन ॲण्ड विंग ते कन्व्हेंशनल कॅन्टिलिवर), माती प्रतिरोधकता चाचणी आणि गायमुख स्थानकातील फरक (स्पाइन ॲण्ड विंग ते ४ ट्रॅक पोर्टल स्टेशन) रु. **३६,१८,७०,३९८**/- इतकी आहे.

आतापर्यंत मंजूर फरक रु. **३६,१८,७०,३९८**/- व प्रस्तावित दोन्ही उड्डाणपूलांची किंमत **रु. ६२,५२,०२,३१३/-** विचारात घेता प्रकल्पाची एकूण रक्कम हि **रु. ४४०,८४,२०,९८१/- (३४२,१३,४८,२७० +३६,१८,७०,३९८ +६२,५२,०२,३१३)** इतकी येत असून हा फरक २८.८५ % आहे जो २०% फरक मर्यादेपेक्षा जास्त आहे.

४.६ त्यानंतर अशी चर्चा करण्यात आली की, MCGM USOR (२०१८) दर सुची वर आधारित अंदाजित रक्कमेच्या संदर्भात असे सांगितले की, सदर २ उड्डाणपुलांच्या अंदाजित खर्चाची (Estimated Cost) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सध्याच्या २०२२-२३ दरसुचीशी (PWD SSR २०२२-२३) तुलना केली असता MCGM USOR (२०१८) चे दर कमी असल्याकारणाने MCGM USOR (२०१८) वर आधारित अंदाजित खर्चाची रक्कम प्रस्तावित केली आहे.

याबाबत महानगर आयुक्त यांनी पुढे असे स्पष्ट केले की, सदर दोन्ही उड्डाणपूल मेट्रो मार्ग- ४ अ प्रकल्पांतर्गत अतिरिक्त काम म्हणून अंमलबजावणी केल्यास खालील महत्वाचे फायदे संभवतात ;

**१. एक स्त्रोत जबाबदारी**:

प्रस्तावित उड्डाणपुल हे चालू असलेल्या मेट्रोच्या कामांसमवेत करण्याचे प्रस्तावित आहे. यास्तव दोन्ही प्रकल्पांच्या संरचना एकात्मिक पद्धतीने बांधावयाच्या आहेत. त्यामुळे मेट्रो कंत्राटदार दोन्ही प्रकल्पाच्या संरचनेच्या संकल्पचित्रे बनविणे आणि बांधकाम करण्यासाठी बांधील राहून याद्वारे एक स्त्रोत जबाबदारी निश्चित करता येईल.

**२. स्लिप रोडची रुंदी**

मेट्रो कंत्राटदाराऐवजी दुसऱ्या कंत्राटदारामार्फत बांधकाम केल्यास उड्डाणपुलांच्या दोन R.E. भिंती या मेट्रो पाईल कॅप पासून काही अंतर सोडून बांधाव्या लागतील. परिणामतः घोडबंदर रस्त्याची मार्गिका जास्त प्रमाणात व्याप्त करावी लागेल व यामुळे स्लिप रोड अरुंद होऊन दोन्ही बाजूस फक्त २ मी. चा स्लिप रोड उपलब्ध राहील; ज्यावरून कोणतीही वाहतूक करणे शक्य होणार नाही.

मेट्रो कंत्राटदाराकडून सदर काम करून घेतल्यास एक स्त्रोत जबाबदारीचा फायदा घेवून रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या कडेस ३.५ मी. रुंदीचा स्लिप रोड उपलब्ध होऊन त्यावरून वाहतूक करता येऊ शकेल. अशा प्रकारची संरचना बनविण्यात येईल.

**३. बांधकामाच्या वेळेमध्ये बचत**:

- मनुष्यबळ व यंत्रसामग्री इ. जमवाजमव करण्यास लागणाऱ्या वेळेत बचत होईल
- प्रकल्प हस्तांतरण करण्यास लागणाऱ्या वेळेत बचत होईल.
- नवीन कंत्राटदारास नेमणूक करण्यास लागणाऱ्या निविदा प्रक्रियेस लागणारा वेळ वाचेल.

**४. सुलभ बांधकाम:**

दोन्ही प्रकल्पांचे बांधकाम एकाच बॅरिकेड केलेल्या जागेत प्रस्तावित असल्याने कंत्राटदार मेट्रो व उड्डाणपूल या दोन्हींचे बांधकाम एकाचवेळी सुलभरित्या करू शकतो.

**५. वाहतूक व्यवस्थापन:**

दोन्ही प्रकल्प एकाच बॅरिकेड क्षेत्रात एकाच कंत्राटदारा मार्फत केल्यास घोडबंदर रस्त्यावर प्रभावी वाहतूक व्यवस्थापन आणि नागरीकांची कमीत कमी गैरसोय होईल.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४२६ :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, कार्यकारी समिती याद्वारे ठाणे परिक्षेत्रातील घोडबंदर मार्गावर प्रस्तावित असलेल्या कासारवडवली आणि भाईंदरपाडा या दोन ऊड्डाणपूलांचे बांधकाम मेट्रो मार्ग-४ अ च्या सीए – ५४ चे बांधकाम करत असलेल्या मे. जे. कुमार इंफ्राप्रोजेक्टस प्रा. लि. या कंत्राटदारामार्फत MCGM SOR (२०१८) च्या दरसूची प्रमाणे **रु. ६२,५२,०२,३१३/-** (रुपये बासष्ट कोटी बावन्न लाख दोन हजार तीनशे तेरा रुपये) या किंमतीवर बांधकाम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या आर्थिक बदलांसह अधिदान करण्यास आणि वरील ठरावाची अमंलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ५</u> : <u>मुंबई मेट्रो प्रकल्पातील मेट्रो मार्ग-७ (अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व) व मेट्रो मार्ग २ब (डी एन नगर - मंडाले ) या मेट्रो मार्गाच्या अंमलबजावणीकरिता साधारण सल्लागार (General Consultants) M/s. AICA यांच्या कार्य कालावधीत मुदतवाढ करण्याबाबत.</u>**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे प्रस्तावित केले की, प्राधिकरणाच्या दि. २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीत तसेच दि. १७ ऑक्टोंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग-७ (अंधेरी पूर्व - दहिसर पूर्व) या मेट्रो मार्गाची उभारणी करणे या प्रकल्पासाठी रु. ६,२०८/- कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्राधिकरणाच्या दि. २१ मार्च २०१६ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीत तसेच दि. २५ ऑक्टोंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग-२ब (डि.एन. नगर - मंडाळे) या उन्नत मेट्रो मार्गाची उभारणी करणे या प्रकल्पासाठी रु. १०,९८६/- कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तसेच मेट्रो मार्ग-७ आणि मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पांसाठी प्राधिकरणाच्या दि. २० सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या २५० व्या बैठकीत साधारण सल्लागार म्हणून मे. AICA Consortium यांना मंजुरी देण्यात आली असून दि. ०५ ऑक्टोबर, २०१६ रोजी मे. AICA Consortium यांची मेट्रो मार्ग-२ब आणि मेट्रो मार्ग-७ चे साधारण सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली.

५.२ याबाबत अशी चर्चा करण्यात आली की, मेट्रो मार्ग ७ आणि मेट्रो मार्ग २ब प्रकल्पांसाठी प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या साधारण सल्लागाराची माहिती खालील प्रमाणे:

| | | | |
|---|---|---|---|
| अ | कामाचे नाव | : | मेट्रो मार्ग ७ आणि मेट्रो मार्ग २ब साठी साधारण सल्लागाराची नेमणूक |
| ब. | सल्लागाराचे नाव | : | मेसर्स आयसा – सीइजी – इटालफर – आयसा समूह |
| क. | कार्यादेशाची तारीख | : | ०५.१०.२०१६ |
| ड. | कंत्राटाचा कालावधी | : | ५४ महिने |
| ई. | कंत्राटाची रक्कम | : | रु. २४८.८८ कोटी (रु. २१५.७७ कोटी + युरो ४५.५० लाख) |

तसेच साधारण सल्लागाराची कामाची संक्षिप्त व्याप्ती खालीलप्रमाणे आहे: -

- मेट्रो मार्ग ७ व २ब च्या स्थापत्य व संलग्न कामांची पर्यवेक्षण करणे (यामध्ये Rolling Stock, Signalling आणि Telecommunication या कामांचा समावेश नाही.)
- मेट्रो मार्ग ७ व २ब च्या डेपोच्या स्थापत्य कामाचे व प्रणाली कामांची (System works) दैनंदिन देखरेख करणे.
- मेट्रो डेपो व मेट्रो स्थानकांची छताचे, सुशोभीकरणाचे, लोहमार्गाचे, उद्वाहक / सरकते जिने व इतर निविदा तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.
- तसेच साधारण सल्लागाराने मेट्रो मार्गाच्या चाचणीत व मेट्रो सुरक्षा आयुक्त यांचे प्रमाणपत्र मिळविण्याकामी प्राधिकरणास सहकार्य करणे.
- निविदा प्रक्रिया, निविदा मूल्यांकन, प्रकल्प व्यवस्थापन, प्रकल्प पर्यवेक्षण, गुणवत्ता नियंत्रण, सुरक्षितता, गुणवत्ता हमी आणि पर्यावरण व्यवस्थापन यासारख्या प्रकल्पाच्या महत्वाच्या पैलू व साधारण सल्लागाराच्या कामात समाविष्ट आहेत.
- साधारण सल्लागाराने मेट्रो स्थापत्य कामे व प्रणालीच्या कंत्राटाची अंतिम देयके तयार करणे व देखभाली संदर्भात पुस्तिका तयार करणे अपेक्षित आहे.

..१३/-

५.३ पुढे अशीही चर्चा झाली की, साधारण सल्लागाराच्या कंत्राटानुसार साधारण सल्लागाराचा कार्यकाळ ०४ एप्रिल, २०२१ रोजी संपुष्टात येत होता. प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेनुसार साधारण सल्लागाराला विविध कारणांमुळे दि. ०४ जुलै, २०२२ रोजी पर्यंत कार्यकाळामध्ये प्रथम मुदत वाढ (EoT-१) देण्यात आली आहे.

५.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमुद केले की, मेट्रो मार्ग ७ व २ ब मधील स्थापत्य कामांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे कंत्राटदारांचा कार्यकाळ वाढविण्यात आला. तसेच काही कंत्राटदारांच्या संथगतीमुळे स्थापत्य बांधकामामध्ये विलंब होत असल्याकारणाने काही कामाचे कंत्राट रद्द करण्यात आले. सद्यस्थितीत मेट्रो मार्ग ७ ची एकूण ९६.८० % प्रगती झाली आहे. मेट्रो मार्गिका ७ चा टप्पा-१ (आरे ते दहिसर) हा टप्पा सर्व सामान्य जनतेकरिता दि. ०२ एप्रिल, २०२२ रोजी पासून सुरु करण्यात आला आहे. तथापि, मेट्रो मार्गिका ७ चा टप्पा-२ (अंधेरी ते आरे) चे काम डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच मेट्रो मार्ग-२ब च्या कामांमध्ये सद्यस्थितीतील एकूण २२.२० % प्रगती झाली असून मेट्रो मार्गिका-२ब (डि. एन. नगर – मंडाळे) चे काम जून, २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे मेट्रो मार्ग ७ व २ब च्या कामांच्या प्रगतीस अनुसरून साधारण सल्लागाराने दि. ३० जून २०२४ रोजीपर्यंत (सुमारे २४ महिने) कालावधी वाढविण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

५.५ चर्चेस अनुसरून असे नमूद केले की, सद्यस्थितीत मेट्रो मार्ग-७ ची आणि मेट्रो मार्ग-२ब ची एकूण प्रगती लक्षात घेता, प्रकल्पातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच, मेट्रो मार्गिकेची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी आणि प्रकल्प क्षेत्राशी परिचित असलेले साधारण सल्लागारांचे सध्यस्थितीत नियुक्त केलेले अभियंते / कर्मचारी या सर्व बाबी विचारात घेता साधारण सल्लागाराचा कार्यकाळ मेट्रो मार्ग-७ साठी दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत आणि मेट्रो मार्ग-२ब साठी दि. ३० जून, २०२४ पर्यंत द्वितीय मुदत वाढ देणे योग्य ठरेल.

सदर कंत्राटाची मूळ किंमत रु. २४८.८८ कोटी (रु. २१५.७७ कोटी + युरो ४५.५० लाख) इतकी होती. साधारण सल्लागाराच्या प्रस्तावित मुदत वाढी (EOT-२) माहे जून, २०२४ पर्यंत केल्यास कंत्राटाच्या रक्कमेत होणारी एकूण वाढ रु. १,२९,७४,३७,८८२/- (रु. १,१९,६२,२९,४४२ + युरो १३,९०,९९०) आहे. सदर वाढ मूळ करार किंमतीच्या ५२.१३% इतकी आहे. साधारण सल्लागाराच्या सल्लागार सेवेच्या (कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) मुदतवाढीसह एकूण वाढ रु. १,७७,४७,०६,२४०/- (रु. १,६६,५२,९२,२१८ + युरो १५,०३,७६६) होत असून मुळ करार किंमतीच्या ७१.३१% अधिक आहे.

तरी उपरोक्त बाबी लक्षात घेता, साधारण सल्लागारास मेट्रो मार्ग ७ करिता दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत व मेट्रो मार्ग २ब करिता ३० जून, २०२४ पर्यंत मुदत वाढ देणे तसेच प्रस्तावित मुदत वाढीस अनुसरुन साधारण सल्लागाराच्या कंत्राटीय रकमेत एकुण रु. १,७७,४७,०६,२४०/- (म्हणजेच रु. १,६६,५२,९२,२१८ + युरो १५,०३,७६६) (मूळ करार किंमतीच्या ७१.३१% अधिक) इतक्या होणाऱ्या वाढीस मान्यता देणेबाबत शिफारस केली.

५.६ वरील प्रस्तावर चर्चा करताना कार्यकारी समिती सदस्यांनी कर्मचाऱ्यांची आवश्यकता (संख्या) कोणत्या आधारे निश्चित करण्यात आली अशी विचारणा केली. याबाबत साधारण सल्लागाराच्या कर्मचाऱ्यांची संख्या, प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार गणना करुन निश्चित करण्यात आली आहे असे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले. तसेच, कार्यकारी समिती सदस्यांनी साधारण सल्लागाराच्या कर्मचाऱ्यांची नियुक्तीसाठी दराविषयी विचारणा केली असता, सदर दर हे कंत्राटाच्या अटी व शर्तीप्रमाणे आहेत असे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन कार्यकारी समितीने मेट्रो मार्ग ७ व मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार “M/s AYESHA INGENIERIA Y ARQUITECTURA S.A.U. आणि समूह / संयुक्त उपक्रमास” यांना कार्य कालावधीत मेट्रो मार्ग ७ करिता दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत व मेट्रो मार्ग २ब करिता ३० जून, २०२४ पर्यंत मुदत वाढीसाठी मान्यता दिली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४२७ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग ७ व मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार “M/s AYESHA INGENIERIA Y ARQUITECTURA S.A.U. आणि समूह / संयुक्त उपक्रमास” यांना कार्य कालावधीत मेट्रो मार्ग ७ करिता दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत व मेट्रो मार्ग २ब करिता ३० जून, २०२४ पर्यंत मुदत वाढीसाठी तसेच मुदत वाढीस अनुसरुन कंत्राटीय रकमेत रु. १,७७,४७,०६,२४०/- + सेवा कर (अधिक ७१.३१% दराचा) इतक्या वाढीचा प्रस्ताव

..१५/-

स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ६ : मेट्रो मार्गिका-४ व ४-अ (वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली-गायमुख) च्या सर्वसाधारण सल्लागारास मुदतवाढ देणे व कंत्राटाच्या रक्कमेत वाढ करणेबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सादरीकरण केले की, मेट्रो मार्ग-४ या प्रकल्पाला राज्यमंत्रीमंडळाने दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत रु. १४,५४९/- कोटी इतक्या रक्कमेस मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने सदर प्रकल्पाकरीता दिनांक २५ ऑक्टोंबर, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. भारताचे मा. पंतप्रधान यांच्या शुभ हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी सदर प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. मेट्रो मार्गिका ४ च्या सर्वसाधारण सल्लागाराच्या निविदेस प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या २५४ व्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. सल्लागाराच्या कामाची अंदाजित रक्कम मेसर्स डी एम आर सी यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार रु.३३६.५५ कोटी इतकी असून सध्या नियुक्त सर्वसाधारण सल्लागार मेसर्स. डिबी इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड कन्सल्टींग जीएमबीएच व हिल इंटरनॅशनल इनकॉर्पोरेटेड आणि लुईस बर्जर कन्सल्टींग कंपनी लिमिटेड (मे. डिबी- हिल-एलबीजी यांचा संयुक्त संघ) यांची कंत्राटाची मंजूर रक्कम रु. २८३.२१ कोटी रुपये (१५.८५% कमी दराने) आहे व या मेट्रो मार्गीकेचे सर्वसाधारण सल्लागार म्हणून दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ पासून त्यांना नियुक्त करण्यात आले आहे. मे. डिबी- हिल-एलबीजी यांच्या संयुक्त संघाच्या कंत्राटाच्या रु. २८३,२१,३२,३९४/- च्या रक्कमेत भारतीय रु. २१७,६०,३९,७८०/- तथा युरो ६९,११,१००/- तथा युएसडी २४,७९,९२०/- या रक्कमांचा समावेश आहे. सर्वसाधारण सल्लागाराच्या कामाची मुदत ५४ महिने होती व ही मुदत दिनांक ३१ मे, २०२२ रोजी संपुष्टात आलेली असल्यामुळे सल्लागाराच्या मुदत वाढीचा व रक्कम वाढीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

..१६/-

६.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, सर्वसाधारण सल्लागाराच्या कामाच्या व्याप्तीत खालील बाबींमुळे वाढ झाली :-

**मेट्रो मार्ग -४अ चा समावेश:**

मेट्रो मार्ग -४ च्या अंतिम टोकावरील कासारवडवली स्थानकाच्या पुढील घोडबंदर रस्त्यावर गायमुख पर्यंत लोकवस्ती व व्यवसाय वेगाने वाढत आहे. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.एमआरडी-३३१८/प्र.क्र.५७/नवि-७, दिनांक २५ जानेवारी, २०१९ नुसार मेट्रो मार्गिका ४ चे कासारवडवली स्थानक ते गायमुख पर्यंत २.८८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गिकेस ४अ म्हणून मान्यता दिली. यामध्ये नियोजित मोघरपाडा मेट्रो डेपोकडे जाणाऱ्या १.५ कि.मी. लांबीच्या पोहोच मार्गिकेचा समावेश आहे. या विस्तारित प्रकल्पाकरिता प्राधिकरणाने मेट्रो ४ च्या सर्वसाधारण सल्लागारास महानगर आयुक्तांच्या दिनांक २३ जून, २०२० च्या मान्यतेनुसार मेट्रो ४अ चे सर्वसाधारण सल्लागार म्हणून नियुक्त केले व त्याकरिता रु.२०,०४,४८,०३०/- इतक्या रक्कमेस मान्यता देण्यात आली आहे . त्यानुसार मेट्रो मार्गिका-४ व ४अ ही वडाळा (मुंबई) पासून सुरु होऊन अमर महल चेंबुर- घाटकोपर- विक्रोळी-मुलुंड- ठाणे- कासारवडवली-गायमुख पर्यंत जाणाऱ्या या मार्गिकेची लांबी ३५.३८ कि.मी. इतकी आहे व यात ३२ मेट्रो स्थानके नियोजित आहेत. या मार्गिकेची सुमारे ३८% इतकी कामे पुर्ण झाली आहेत.

**मोनो रेल्वे स्थानक व भुयारी मेट्रो मार्गिका -३ यांची जोडणी:**

मेट्रो मार्गिका ४ चे वडाळा –भक्तीपार्क येथील नियोजित मेट्रो स्थानक व मोनोरेल यांचे एकत्रिकरण यापुर्वीच नियोजित आहे. त्याप्रमाणेच मोनोरेल्वेचे गंतव्य स्थान असलेले संत गाडगे महाराज चौक स्थानक मुंबई व भुयारी मेट्रो मार्गिका ३चे महालक्ष्मी मेट्रो स्थानक यांची जोडणी अत्यंत महत्वाची असून हजारो प्रवाशांना यामुळे उन्नत मोनोरेल्वे मधून भुयारी मेट्रो रेल्वेमध्ये विनासायास थेट प्रवेश करणे शक्य होणार आहे.

अंतिमत: मोनोरेल्वेच्या प्रवाशी संख्येतही लक्षणीय वाढ होणे संभव आहे. त्याकरिता मेट्रो ४ चे सर्वसाधारण सल्लागार मेसर्स. डिबी इंजिनिअरिंग ॲण्ड कन्सल्टींग जीएमबीएच व हिल इंटरनॅशनल इनकॉर्पोरेटेड आणि लुईस बर्जर कन्सल्टींग कंपनी लिमिटेड (मे. डिबी- हिल-एलबीजी) यांना सदर एकत्रिकरणाचा ‘सविस्तर प्रकल्प अहवाल’ तयार करण्यास प्राधिकरणाने सांगितले व हया प्रस्तावास आणि त्याकरिता लागणाऱ्या रु. ४४ लाख इतक्या रक्कमेस महानगर आयुक्त यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी मान्यता दिली. अशा तऱ्हेने सर्वसाधारण सल्लागाराची कंत्राटाची एकुण रक्कम रु. ३०३,६९,८०,४२४/- इतकी होती.

६.३ याबाबत अशी चर्चा झाली की, सर्वसाधारण सल्लागाराची कंत्राटानुसार असलेली ५४ महिन्याची मुळची मुदत दिनांक ३१ मे, २०२२ रोजी संपुष्टात आल्याने सल्लागाराने दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ मागितली व त्याकरिता रु. १३८,५२,९०,९१०/- (४८.९१% अधिक) इतक्या रक्कमेचा प्रस्ताव दिला होता. त्यावर प्राधिकरणाने सल्लागारास फेरविचार करुन प्रस्तावाची रक्कम कमी करण्यासंबंधी कळविले. सल्लागाराने नियोजित मनुष्यबळाचा फेर आढावा घेऊन सदर रक्कम कमी करुन रु. १३५,५७,४०,०८६/-, (रु. ११५,०८,९२,०५६/- इतकी वाढीव रक्कम मेट्रो ४ करिता अधिक रु.२०,०४,४८,०३०/- मेट्रो ४अ करिता अधिक रु. ४४,००,०००/- मोनोरेल व भुयारी मेट्रो रेल्वे जोडणीच्या सविस्तर प्रकल्प अहवालाकरिता) अशी मुळ स्विकृत कंत्राटाच्या रु.२८३,२१,३२,३९४/- इतक्या किंमतीच्या वर ४७.८७% वाढीव रक्कमेचा व दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंतच्या मुदत वाढीचा अंतिम प्रस्ताव दिला.

६.४ मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्वसाधारण सल्लागाराच्या मुदतवाढीच्या मागणीबाबत विचारणा केली असता त्यावर महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मोघरपाडा येथे डेपोकरिता जमिन मिळविण्यासाठीचा विलंब, तसेच गोदरेज कंपनीच्या ताब्यातील जमिनीपैकी मेट्रो मार्गिकेकरिता लागणारा भूभाग अद्याप ताब्यात येणे बाकी आहे. तसेच कोविड -१९ हया वैश्विक साथीच्या रोगामुळे स्थापत्य कामांच्या वेगावर परिणाम आणि रिलायन्स - अस्टाल्डी या कंत्राटदाराच्या कामांतील संथगती हेही घटक मुदत वाढीस कारणीभूत आहेत मात्र रिलायन्स - अस्टाल्डी यांच्या उर्वरित संपूर्ण कामांकरिता उपकंत्राटदार नियुक्त करण्यात आलेले असून कामे सुरु आहेत.

६.५ महानगर आयुक्त यांनी मेट्रो मार्ग ४ व ४ अ च्या अंमलबजावणीतील कालमर्यादेच्या वाढीची कारणे खालीलप्रमाणे सविस्तर विषद केली :-

मेट्रो ४ व ४अ करिता अद्याप डेपोची जागा निश्चित झालेली नाही. शिवाय घाटकोपर-गोदरेज येथील जमीनीतून जाणाऱ्या मार्गिकेबाबत गोदरेज कंपनीने न्यायालयात दावा दाखल केला असल्यामुळे या भागातील स्थापत्य कामे सध्या स्थगित आहेत. मेट्रो ४ व ४अ या मार्गिकेत सुमन नगर व अमर महल ही पुर्व नियोजित मेट्रो स्थानके साईटवरील अडचणी व मर्यादांमुळे रद्द करण्यात आली आहेत. कास्टींग यार्ड हस्तांतरण विलंब, सीआरझेड परवानग्या, कांदळवन (Mangrooves) परवानग्या, संरेखनामधील समस्या, पोहोच रस्त्यामधील अडचणी, वृक्ष कापणी -पुर्नरोपण परवानग्या, अतिक्रमणे, रेल्वेकडून परवानग्यांस विलंब, कंत्राटदारांच्या कामामध्ये विलंब अशा काही बाबी मुळ प्रकल्पाच्या मुदत वाढीस कारणीभूत ठरल्या आहेत.

..१८/-

वडाळा मेट्रो स्थानक व नियोजित जीएसटी भवन यांचे एकत्रीकरण, सिध्दार्थ कॉलनी मेट्रो स्थानक व मेट्रो मार्गिका -२बी यांचे एकत्रीकरण, गांधीनगर मेट्रो स्थानकाचे मेट्रो मार्गीका ६ बरोबर एकत्रीकरण, कापूरबावडी मेट्रो स्थानकाचे मेट्रो मार्गिका ५ बरोबर एकत्रीकरण अशा अनेक बाबींमुळे कालमर्यादा वाढली

यशवंत सोसायटी घाटकोपर यांची हरकत व प्रलंबित न्यायालयीन याचिका, सावित्रीबाई फुले नगर रहिवासी घाटकोपर यांची हरकत, मेट्रो स्थानकांच्या संरचनेत दोन खांबी पोर्टल ऐवजी एक खांबी कॅन्टीलिव्हर योजनेत बदल, मेट्रो स्थानकांच्या प्रवेश –निकास जिन्यांच्या भुसंपादनातल्या अडचणी याही बाबी कालमर्यादा वाढीस कारणीभूत झाल्या आहेत.

कोविड-१९ या वैश्विक महामारी रोगाच्या प्रार्दुभावामुळे कामांच्या अंमलबजावणीत सुमारे दिड वर्षांचा अडथळाही आला.

६.६ याबाबत पुढे अशी चर्चा करण्यात आली की, सध्याच्या कंत्राटदारांकडून स्थापत्य कामे पुर्ण करण्यात अनेक कारणांमुळे विलंब होत आहे व कंत्राटदारांनीही मुदतवाढीसाठी प्रस्ताव दिले आहेत. स्थापत्य कामे मे, २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने व पुढील प्रणालीच्या कामांकरिता सर्वसाधारण सल्लागारास मुदत वाढ देणे आवश्यक आहे.

नव्याने सर्वसाधारण सल्लागाराच्या नियुक्तीकरिता निविदा प्रक्रिया राबविण्याचे ठरल्यास त्यात काही कालावधी जाऊ शकतो व नवीन आलेल्या सल्लागारास पूर्ण क्षमतेने मनुष्यबळ वापरून सध्याचा मेट्रो मार्ग -४ व ४अ चा प्रकल्प पुढे राबविण्यास किमान ५ ते ६ महिन्यांचा अधिकचा कालावधी लागू शकतो ज्याचा परिणाम मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्याच्या अपेक्षित तारखेवर होवू शकतो.

मेट्रो मार्ग-४ व ४अ ची सद्य:स्थितीतील एकूण सुमारे ३८% प्रगती लक्षात घेता, सर्वसाधारण सल्लागाराद्वारे प्रकल्पाचे व्यवस्थापन, प्रकल्पाची देयके तयार करणे (Bill), अतिरिक्त खर्चाचे प्रस्ताव (variations proposals), अॅज-बिल्ड नकाशे (As-build Drawings) तयार करणे इ., तसेच पुढील मेट्रो प्रणालीची विद्युत व यांत्रिकी कामे पूर्ण करून घेणे इत्यादींकरिता तसेच कामात सातत्य राखण्यासाठी महानगर आयुक्त यांनी सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या सर्वसाधारण सल्लागाराची सेवा माहे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी पर्यंत सुरू ठेवण्याकरिता मान्यता दिली.

६.७ महानगर आयुक्त यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर सर्वसाधारण सल्लागार यांना कार्यकारी समितीच्या बैठकीत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी व

या वाढीव कालावधीसाठी सर्वसाधारण सल्लागाराची फी म्हणून रु. ९६,१०,९८,८३७/- (स्वीकृत कंत्राटाच्या रु. २८३,२१,३२,३९४/- रक्कमेपेक्षा अधिक ३३.९४% म्हणजे एकूण कंत्राट रक्कम रु. ३७९,३२,३१,२३१/-) इतक्या वाढीस मान्यता देण्यात यावी अशी कार्यकारी समितीस विनंती केली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४२८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग-४ व ४अ चे सर्वसाधारण सल्लागार मेसर्स. डिबी इंजिनिअरिंग ॲण्ड कन्सल्टींग जीएमबीएच व हिल इंटरनॅशनल इनकॉर्पोरेटेड आणि लुईस बर्जर कन्सल्टींग कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त संघास दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत मुदत वाढीसाठी तसेच मुदतवाढीच्या कंत्राटाच्या रक्कमेत रु. ९६,१०,९८,८३७/- (वस्तू व सेवा कर वगळून) (कंत्राटाच्या रक्कमेच्या ३३.९४% अधिक) इतक्या वाढीचा प्रस्ताव स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र. ७ : तळोजा एम.आय.डी.सी.रोड ते एन.एच.४ दरम्यान विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्त्याच्या कामाकरीता लघुत्तम निविदाकाराची (कंत्राटदाराची) नेमणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

७.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तळोजा एम.आय.डी.सी रोड ते एन. एच. ४ (जुना) दरम्यानच्या विकास आराखडयातील प्रस्तावित रस्त्याच्या बांधकामास विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मान्यता देण्यात आलेली आहे. मा.नगर विकास मंत्री व अध्यक्ष मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी दि. ०९/०९/२०२१ रोजी ₹.१८९.३२ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली.

७.२ कार्यकारी समितीस असे अवगत करण्यात आले की, तळोजा एम.आय.डी.सी रोड ते एन.एच.४ (जुना) दरम्यानच्या विकास आराखडयातील प्रस्तावित रस्त्याच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया e-Tender पद्धतीने करण्यात आली असून निविदा सुचना दि. २८/०४/२०२२ रोजी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर व वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली. निविदा सादर करण्यासाठी दि. ०७/०६/२०२२ पर्यंत मुदत देण्यात आली होती. निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत ०६ निविदाकारांनी त्यांच्या निविदा सादर केल्या :-

१. मे. अश्विनी इन्फ्राडेव्हल्पमेंट्स प्रा. लि.
२. मे. ठाकूर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.
३. मे. आर.इ. इन्फ्रा प्रा.लि.
४. मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि.
५. मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.
६. मे. अजवानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि.

७.३ अशीही चर्चा करण्यात आली की, प्राप्त निविदांचे लिफाफे ‘अ’ आणि ‘ब’ दि. १३/०६/२०२२ रोजी उघडण्यात आले. सदर प्राप्त झालेल्या दोन्ही निविदांचे लिफाफे (Envelope - A&B) निविदा दस्तावेज / CSD मध्ये नेमणूक केलेल्या पात्रता निकषांनुसार मुल्यमापन मे. ॲकोटेक कंन्सलटंन्ट प्रा .लिमिटेडद्वारे करण्यात आले. निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची सल्लागारामार्फत तांत्रिक पडताळणी केली असता चार निविदाकारांच्या निविदा पात्र ठरल्या. पात्र व अपात्र निविदाकारांचे अहवाल निविदा पडताळणी समितीस सादर करण्यात आले. सदर समितीने ४ पात्र निविदाकांरांचे ‘क’ लिफाफा उघडण्यास मान्यता दिली. सदर देकार हे निविदा रक्कमेच्या जवळपास असल्याने त्यानुसार निविदाकारांचे आर्थिक देकारांचे ‘क’ लिफाफे दि. २२/०७/२०२२ रोजी उघडण्यात आले. प्राप्त आर्थिक देकारांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**अंदाजपत्रकीय रककम : (₹):** ₹९९,५१,५८,११८/- (१२% वस्तु व सेवाकर+प्रोव्हीजीनल सम+रॉयल्टी)

**कामाचा कालावधी :** २४ महिने (पावसाळा कालावधी सहित)

| **अ.क्र.** | **निविदाकार** | **सादर आर्थिक देकार (१२% वस्तु व सेवाकर +प्रोव्हीजीनल सम+रॉयल्टी)** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे. अजवानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ₹.१००,४५,१२,१७२.४८ | तृतीय लघुत्तम |
| २ | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ₹.९९,७०,२८,९२८.९ | व्दितीय लघुत्तम |
| ३ | मे. आर.इ. इन्फ्रा प्रा.लि. | ₹.९८,५८,९७,६०४.०६ | प्रथम लघुत्तम |
| ४ | मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | ₹.९९,९८,३५,१४५.२४ | चतुर्थ लघुत्तम |

प्राप्त निविदांमधील मे. आर.इ. इन्फ्रा प्रा.लि. यांनी सादर केलेली ₹. ९८,५८,९७,६०४.०६ ची निविदा लघुत्तम आहे. सदर देकार हा निविदा रक्कमेपेक्षा ०.९९ (-) % कमी आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४२९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) व पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत तळोजा एम.आय.डी.सी रोड ते एन. एच. ४(जुना) दरम्यान विकास आराखडयातील प्रस्तावित रस्त्याच्या कामाकरीता मे. आर.इ. इन्फ्रा प्रा.लि. यांनी सादर केलेली ₹. ९८,५८,९७,६०४.०६ ची लघुत्तम निविदा रक्कमेपेक्षा ०.९९ (-) % कमी अंदाजपत्रकीय रकमेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र. ८ : अ) प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल : दिनांक ०१ जानेवारी, २०२२ ते दिनांक ३१ मार्च, २०२२**

८.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ०१ जानेवारी, २०२२ ते ३१ मार्च, २०२२ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली.

८.२ त्यानंतर कार्यकारी समितीने दिनांक ०१ जानेवारी, २०२२ ते ३१ मार्च, २०२२ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय : सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

..२२/-

**बाब क्र. ८ : ब) प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल : दिनांक ०१ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३० जून, २०२२**

८.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ०१ एप्रिल, २०२२ ते ३० जून, २०२२ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली.

८.२ त्यानंतर कार्यकारी समितीने दिनांक ०१ एप्रिल, २०२२ ते ३० जून, २०२२ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय : सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ०९: अ) मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल – दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३० सप्टेंबर,२०२१**

९.१ महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीबाबत संक्षिप्त माहिती दिली.

९.२ त्यानंतर दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते ३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ०९ : ब) मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल – दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ ते दिनांक ३१ मार्च,२०२२**

९.१ महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीबाबत संक्षिप्त माहिती दिली.

९.२ त्यानंतर दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ ते ३१ मार्च, २०२२ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. १०: मेट्रो मार्ग-१० (गायमुख-शिवाजी चौक (मिरा रोड)) आणि मेट्रो मार्ग-१२ (कल्याण-तळोजा) च्या स्थापत्य व प्रणाली कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची (General Consultant) नेमणूक करणेबाबत.**

१०.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे प्रस्तावित केले की, मेट्रो मार्ग – १० (गायमुख - शिवाजी चौक (मिरा रोड)) ९.२०९ कि. मी.लांबीचा असून यात एकूण ४ मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. सदर मेट्रो मार्गाला प्राधिकरणाच्या दि. २१ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या १४६ व्या बैठकीत तसेच दि. ६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अंदाजित केलेल्या रु. ४,४७६ कोटी प्रकल्प पूर्णत्वाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर मेट्रो मार्ग-१० हा मेट्रो मार्ग-४ व ४-अ चा उत्तरेकडील विस्तार असून ह्या प्रकल्पामुळे मुंबई, बोरीवली, मीरा, भाईंदर, घोडबंदर रोड व ठाणे या परिसरातील नागरीकांना मोठा फायदा होणार आहे. त्याचप्रमाणे, मेट्रो मार्ग-१२ (कल्याण - तळोजा) २०.७५६ कि. मी. लांबीचा असून यात एकूण १७ मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. सदर मेट्रो मार्गासाठी अंदाजित केलेल्या रु. ५,८६५ कोटी प्रकल्प पूर्णत्वाच्या खर्चास प्राधिकरणाच्या दि. २१ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या १४६ व्या बैठकीत तसेच दि. ६ सप्टेंबर २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मेट्रो मार्ग-१२ हा मेट्रो मार्ग-५ (ठाणे - भिवंडी - कल्याण) चा विस्तार असून सदर प्रकल्पामुळे कल्याण, डोंबिवली व नवी मुंबई या परिसरातील नागरीकांना मोठा फायदा होणार आहे.

१०.२ उपरोक्त मेट्रो मार्गांच्या स्थापत्य व प्रणाली कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची नियुक्ती करण्याकरीता ई-निविदा मागविण्यासाठी वृत्तपत्रात दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे/ शंकांचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख दि. ११ एप्रिल, २०२२ होती. दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी

..२४/-

सकाळी ११.३० वाजता लिफाफा 'अ' (निविदा किंमत) व १९ एप्रिल, २०२२ रोजी लिफाफा 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या व वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १. | मे. एईकॉम इंडिया प्रा. लि., हिल इंटरनॅशनल आयएनसी, ओरिएंटल कन्सल्टंट्स ग्लोबल कंपनी लिमिटेड आणि निप्पॉन कोई कंपनी लि. यांचे संयुक्त उपक्रम. |
| २. | मे. सिस्ट्रा एस. ए.आणि मे. डी. बी. इंजिनियरिंग आणि कन्सल्टिंग जीएमबीएच, यांचे संयुक्त उपक्रम. |
| ३. | मे.आयेसा इंजेनेरिया वाय आर्किटेक्टुरा एस.ए.यू, मे.कन्सल्टींग इंजिनीयरिंग ग्रुप आणि कोरिया नॅशनल रेल्वे यांचे संयुक्त उपक्रम. |

१०.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राप्त झालेल्या ई-निविदाका-यांच्या निविदांचे तांत्रिक मुल्यमापन निविदेतील निकषांनुसार करण्यात आले. त्यानुसार निविदाकारांच्या प्राप्त गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त तांत्रिक गुण (८०००) | प्राप्त गुण (%) |
|---|---|---|---|
| १. | मे. एईकॉम इंडिया प्रा. लि., हिल इंटरनॅशनल आयएनसी, ओरिएंटल कन्सल्टंट्स ग्लोबल कंपनी लिमिटेड आणि निप्पॉन कोई कंपनी लि. यांचे संयुक्त उपक्रम. | ७५७६.८७ | ९४.७१ |
| २. | मे. सिस्ट्रा एस. ए.आणि मे. डी. बी. इंजिनियरिंग आणि कन्सल्टिंग जीएमबीएच, यांचे संयुक्त उपक्रम. | ७१८२.५८ | ८९.७८ |
| ३. | मे.आयेसा इंजेनेरिया वाय आर्किटेक्टुरा एस.ए.यू, मे.कन्सल्टिंग इंजिनीयरिंग ग्रुप आणि कोरिया नॅशनल रेल्वे यांचे संयुक्त उपक्रम. | ६९३९.४९ | ८६.७४ |

१०.४ निविदा प्रस्तावात नमूद खंड १, कलम क्र. २०.१.२ अन्वये ज्या निविदाकारांच्या तांत्रिक प्रस्तावाला ८० % अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील. तांत्रिक निकषांनुसार तीनही निविदाकारांना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असून तीनही निविदाकार तांत्रिकदृष्टया निविदेतील अटींप्रमाणे आर्थिक प्रस्ताव उघडण्यास पात्र होतात. निविदा शिफारस समितीने, प्राधिकरणाच्या तांत्रिक मूल्यमापन समितीच्या अहवालानुसार

तीन पात्र निविदाकारांचे लिफाफा ‘क’ (आर्थिक प्रस्ताव) उघडण्याची शिफारस केली. महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने तीन पात्र निविदाकारांचे लिफाफा ‘क’ (आर्थिक प्रस्ताव) दिनांक २५ जुलै, २०२२ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले.

प्राप्त वित्तीय प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी निविदेतील अटींप्रमाणे, अंतिम निविदा सादर करण्याच्या तारखेच्या २८ दिवस आधीचा म्हणजेच दिनांक १४ मार्च, २०२२ रोजीचा विनिमय दर (१ USD = रु. ७६.६० आणि १ EURO = रु. ८३.६५) घेऊन प्राप्त आर्थिक प्रस्तावांचे एकूण रुपयांत रुपांतर करण्यात आले आहे व वित्तीय प्रस्तावांचा (वस्तू व सेवा कर वगळता) तपशील खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | रुपये घटक | युरो घटक | डॉलर घटक | एकूण (निविदा कलमानुसार योग्य विनिमय दराप्रमाणे परिशिष्ट ‘अ’नुसार एकूण रुपयामध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. एईकॉम इंडिया प्रा. लि., हिल इंटरनॅशनल आयएनसी, ओरिएंटल कन्सल्टंट्स ग्लोबल कंपनी लिमिटेड आणि निप्पॉन कोई कंपनी लि. यांचे संयुक्त उपक्रम. | २७६,९४,५७,५७५ | - | ८७,६७,८०० | ३४४,१०,७१,०५५ |
| २. | मे. सिस्ट्रा एस. ए.आणि मे. डी. बी. इंजिनियरिंग आणि कन्सल्टिंग जीएमबीएच, यांचे संयुक्त उपक्रम. | २०५,५०,७२,४२५ | ७५,३४,५३० | - | २६८,५३,३५,८६० |
| ३. | मे. आयेसा इंजेनेरिया वाय आर्किटेक्टुरा एस.ए.यू, मे.कन्सल्टिंग इंजिनीयरिंग ग्रुप आणि कोरिया नॅशनल रेल्वे यांचे संयुक्त उपक्रम. | २०६,९९,८४,५५० | २१,३५,८५० | ३८,६५,८९८ | २५४,४७,७६,१८९ |

१०.५ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, निविदा प्रस्तावातील कलमांनुसार तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव एकत्रित करताना तांत्रिक निकषाला ८०% भार आणि आर्थिक निकषाला

..२६/-

२०% भार देण्यात आले. त्याप्रमाणे प्राप्त एकत्रित गुण खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ. क्र | निविदाकारांचे नाव | तांत्रिक गुण (८००० पैकी) | आर्थिक गुण (२००० पैकी) | एकत्रित गुण (१०००० पैकी) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. एईकॉम इंडिया प्रा. लि., हिल इंटरनॅशनल आयएनसी, ओरिएंटल कन्सल्टंट्स ग्लोबल कंपनी लिमिटेड आणि निप्पॉन कोई कंपनी लि. यांचे संयुक्त उपक्रम. | ७५७६.८७ | १४७२.६२ | ९०४९.४९ | २ |
| २. | मे. सिस्ट्रा एस. ए.आणि मे. डी. बी. इंजिनियरिंग आणि कन्सल्टिंग जीएमबीएच, यांचे संयुक्त उपक्रम. | ७१८२.५८ | १८९३.६५ | ९०७६.२३ | १ |
| ३. | मे. आयसा इंजेनेरिया वाय आर्किटेक्टुरा एस.ए.यू. मे.कन्सल्टिंग इंजिनीयरिंग ग्रुप आणि कोरिया नॅशनल रेल्वे यांचे संयुक्त उपक्रम. | ६९३९.४९ | २००० | ८९३९.४९ | ३ |

१०.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, निविदेतील अटींनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल एकत्रित गुण संपादन करणा-या निविदाकाराचा प्रस्ताव देकाराकरिता ग्राह्य धरण्याची तरतूद आहे. मे. सिस्ट्रा एस. ए.आणि मे. डी. बी. इंजिनियरिंग आणि कन्सल्टिंग जीएमबीएच, यांचे संयुक्त उपक्रम यांना कमाल एकत्रित गुण मिळाले असून त्यांनी रु. २०५,५०,७२,४२५/- + EURO ७५,३४,५३०.०० (एकूण रु .२,६८,५३,३५,८६०/-) एवढ्या किंमतीचा देकार सादर केला आहे. मेट्रो मार्ग-१० व मेट्रो मार्ग-१२ ची अंदाजित निविदा किंमत रु. २८९ कोटी या किंमतीच्या ७.०८% एवढा कमी आहे आणि मेट्रो मार्ग-१० व १२ प्रकल्प पुर्णत्वाच्या किंमतीच्या (रु. ४,४७६ + रु. ५,८६५ = रु. १०३४१ कोटी च्या) सुमारे २.६०% आहे.

१०.७ डॉलरच्या रूपांतरणाच्या दराची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सध्याच्या किंमतीवर डॉलर/युरोचे अधिदान करणे आवश्यक आहे, परंतु निविदेचे आर्थिक मूल्यमापन करण्याच्या हेतूने, निविदा तरतुदीनुसार निविदा सादर करण्याच्या तारखेच्या २८ दिवस अगोदरचे रूपांतरणाचे दर विचारात घेण्यात आले आहेत.

१०.८ त्यानंतर अशीही चर्चा करण्यात आली की, मे. सिस्ट्रा एस. ए.आणि मे. डी. बी. इंजिनियरिंग आणि कन्सल्टिंग जीएमबीएच, यांचा प्रस्ताव निविदेतील सर्व अटींचे

अनुपालन करणारा तसेच संयुक्त व वित्तीय निकषानुसार निवड झालेला प्रस्ताव सुसंवादी व वाजवी असल्यामुळे मे. सिस्ट्रा एस. ए.आणि मे. डी. बी. इंजिनियरिंग आणि समुह/संयुक्त उपक्रम यांची नेमणुक करणे प्रस्तावित आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४३० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग-१० (गायमुख - शिवाजी चौक (मीरा रोड)) आणि मेट्रो मार्ग-१२ (कल्याण – तळोजा) या दोन्ही मेट्रो मार्गाच्या स्थापत्य व प्रणाली कामाच्या अंमलबजावणी करीता साधारण सल्लागार म्हणून मे. सिस्ट्रा एस. ए. आणि मे. डी. बी. इंजिनियरिंग आणि कन्सल्टिंग जीएमबीएच, यांचे संयुक्त उपक्रम यांचा रु. २०५,५०,७२,४२५/- + EURO ७५,३४,५३०.०० (एकुण रु. २,६८,५३,३५,८६०/-) (वस्तू व सेवाकर वगळता) एवढया किंमतीचा देकार स्विकारण्यास व मेट्रो मार्ग १० व १२ च्या स्थापत्य व प्रणालीच्या कामांसाठी साधारण सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलांसह अधिदान करण्यास आणि वरिल ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*******